५ वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क
सेवा विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२)
ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१६

महाराष्ट्र शासन,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
नवीन शासकीय कुटीर क्रमांक १५ व १६,
प्लॉट क्रमांक १७६,फ्रि प्रेस जर्नल मार्ग,
मुंबई ४०० ०२१.
परिपत्रक क्र. संलेको/परीक्षा१७/५ वी म.ले.स्था.नि.ले.वि.परीक्षा/२०१६/२२१
दिनांक :- 19 AUG 2016
संदर्भ :- वित्त विभाग अधिसूचना दि.०३.०३.२०१२

परिपत्रक

प्रस्तावना

वित्त विभागाच्या दि. ०३/०३/२०१२ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने संचालनालय, लेखा व कोषागारे व संचालनालय, स्थानिक निधी लेखा यांचे अधिनस्त कार्यालयातील दि. ०२/१२/२००८ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांकरीता महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा विभागीय परीक्षा भाग-१ व भाग-२ माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०१६ मध्ये अमरावती, औरंगाबाद, कोकण, नागपूर, नाशिक, पुणे या केंद्रामध्ये घेण्यात येईल. परीक्षेची तारीख व परीक्षा स्थळांचा संपूर्ण पत्ता यथावकाश कळविण्यात येईल.

जे शासकीय कर्मचारी दि. ०२.१२.२००८ पूर्वी शासन सेवेत आले आहेत व सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण झाले असून महाराष्ट्र लेखा लिपीक परीक्षा उत्तीर्ण झाले नसतील त्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा परीक्षेच्या भाग २ या परीक्षेस सर्व विषय घेऊन उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. तसेच यापूर्वीच्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षेत तसेच लेखा लिपीक परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या तथापि काही विषयात सूट मिळालेल्या विषयांचा फायदा त्या उमेदवारांना मिळणार नाहीत. त्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा विभागीय परीक्षेतील त्या भागाची परीक्षा सर्व विषय घेऊन देणे नियम १४(१) व (२) नुसार अनिवार्य राहील याची कृपया नोंद घ्यावी.

परीक्षा

महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षा नियम २०१२, अधिसूचना दि.०३.०३.२०१२ नियम ३ (ख) नुसार जे लेखा लिपीक पदोन्नतीने तसेच नामनिर्देशनाने नियुक्त झाले आहेत ते कर्मचारी या परीक्षेच्या भाग १ ला बसण्यास पात्र असतील तसेच नियम ३ (ग) नुसार जे कर्मचारी नामनिर्देशनाने नियुक्त झालेले आहेत असे लेखा व कोषागारातील गट-क सेवेतील कनिष्ठ लेखापाल आणि स्थानिक निधी लेखा गट-क सेवेतील कनिष्ठ लेखापरीक्षक या परीक्षेच्या भाग-१ व भाग-२ ला बसण्यास पात्र असतील आणि नियम ३(च) नुसार माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झालेले इतर विभागातील शासकीय कर्मचारी, वैकल्पिक तत्त्वावर सदर परीक्षेच्या भाग-दोन ला बसू शकतील. तथापि, सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे, ते लेखा व कोषागारे गट-क सेवा किंवा स्थानिक निधी लेखा गट-क सेवा यांच्या संदर्भात सेवाप्रवेश किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र असणार नाहीत.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक इएक्सएम-१०८०/१७, दिनांक १७ एप्रिल, १९८० नुसार महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२) मराठी माध्यमातूनच घेण्यात येणार आहे. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद / कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुखांनी ही बाब, परीक्षार्थींच्या निदर्शनास आणावी.

मराठीतून नियम पुस्तके तयार नसल्यास परिक्षार्थींनी उत्तरे लिहितांना, जिथे कोणताही नियम उध्दत करणे आवश्यक आहे तिथे तो नियम इंग्रजीतून लिहिण्यास हरकत नाही. मराठीतून उत्तरे लिहिताना प्रतिशब्द आठवत नसतील तेथे इंग्रजी शब्द वापरण्याची मुभा उमेदवारांना देण्यात येत आहे. मात्र उत्तराचा बाकीचा मजकूर मराठीतूनच लिहिणे अनिवार्य आहे.

ज्यांची मातृभाषा मराठी नाही, तसेच जे त्यांना सक्तीची असलेली एतदर्थ मंडळाची मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण नाहीत व ज्यांचे मराठीचे ज्ञान फारच अपुरे आहे अशाच कर्मचा-यांच्या बाबतीत अपवादात्मक परिस्थितीमध्ये इंग्रजीतून उत्तरे लिहिण्याची परवानगी देण्यात येईल. याबाबत विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी अर्जामध्ये स्पष्टपणे शिफारस करावी. संबंधीत अर्जदारांनी मराठीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे अथवा नाही याचा खुलासा करावा.

उपरोक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षेतील भाग-२ मधील पेपर क्रमांक ४ इंग्रजी ऐवजी मराठी प्रश्न पत्रिकेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील:-

1. दिलेल्या प्रकरणांचा सारांश लिहिणे गुण ४०
2. पत्राचा मसुदा तयार करणे गुण ४०
3. शब्दांचा उपयोग करणे आणि वाक्यांची दूरुस्ती करणे गुण २०

परीक्षेस बसण्यासाठी अर्ज करण्याची पध्दती :-

सदर परीक्षेस बसण्यासाठी परवानगी मागण्यांबाबतच्या अर्जाचा नमुना या परीपत्रकासोबत जोडण्यात आला आहे. शासनाच्या आणि जिल्हा परिषदेच्या कार्यालयातील उमेदवारांना खाली नमूद केलेल्या जिल्हयांकरीता त्यांच्यासमोर दर्शविलेल्या केंद्रामध्ये सदर परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांना नेमून दिलेली परीक्षा केंद्रे बदलता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अ.क्र	जिल्हे	परीक्षा केंद्र
१.	मुंबई, ठाणे, रत्नागिरी , सिंधुदूर्ग, रायगड व पालघर	कोकण
२.	पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर	पुणे
३.	नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा व गोंदिया	नागपूर
४.	औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद, लातूर व हिंगोली	औरंगाबाद
५.	नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर व नंदूरबार	नाशिक
६.	अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम	अमरावती

महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षेचा (भाग-१ व भाग-२) तारीखवार कार्यक्रम परीक्षेची परवानगी देतेवेळी कळविण्यात येईल.

नोव्हेंबर २०१६ मध्ये होणारी ५ वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षेला (भाग-१ व भाग-२) बसू इच्छिणा-या उमेदवारांना अर्ज विहित नमुन्यात दोन प्रतींमध्ये दिनांक **०१/०९/२०१६** किंवा त्यापूर्वी त्यांच्या कार्यालय / विभागप्रमुखांना सादर करावेत. जिल्हा परिषद कर्मचा-यांचे अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांचेकडे सादर करावेत.

कार्यालय/ विभाग प्रमुखांना सूचना

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२) या परीक्षेस बसू इच्छिणा-या उमेदवारांची परवानगी मिळण्याबाबतच्या अर्जाची विहित नियमानुसार छाननी करुन त्यातील एक प्रत आपल्या कार्यालयास ठेवून एक प्रत आपल्या कार्यालयाशी, संबंधीत विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे यांचेकडे (खालीलप्रमाणे नमूद केलेल्या सहसंचालक कार्यालयात) दि. **१५/०९/२०१६** पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठविण्यात यावेत. उमेदवारांचे अर्ज कार्यालय प्रमुख/मुख्य कार्यकारी अधिकारी/विभाग प्रमुख यांनी स्वत:च्या स्वाक्षरीने प्रमाणित करावेत. त्यांच्या कार्यालयातील अन्य अधिकाऱ्यांनी हे अर्ज प्रमाणित केल्यास ते स्विकारण्यात येणार नाही.

अ.क्र	विभाग	कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी व ई-मेल आयडी
१	कोकण	सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, कोकण भवन, पाचवा मजला, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ दुरध्वनी क्र. २७५८०२२१, E-Mail ID-jd.konkan@mahakosh.in
२.	पुणे	सहसंचालक,लेखा व कोषागारे,पुणे विभाग,पुणे लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,पुणे ४११ ००१ दुरध्वनी क्र.०२०-२६१२४९५९, E-Mail ID-jd.pune@mahakosh.in
३.	नागपूर	सहसंचालक,लेखा व कोषागारे,नागपूर विभाग,नागपूर लेखा कोष भवन, जुने सचिवालय इमारत,सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१, दुरध्वनी क्र. ०७१२-२५६१०२३/२५६००२१ E-Mail ID-jd.nagpur@mahakosh.org.in
४.	औरंगाबाद	सहसंचालक,लेखा व कोषागारे,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद लेखा कोष भवन, दुसरा मजला, औरंगाबाद ४३१ ००१ दुरध्वनी क्र.०२४०-२३४०७५४/२३३१८७४ E-Mail ID-jd.aurangabad@mahakosh.in
५.	नाशिक	सहसंचालक,लेखा व कोषागारे,नाशिक विभाग,नाशिक लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक ४२० ००१ दुरध्वनी क्र.०२५३-२५८१५७४, E-Mail ID-jd.nashik@mahakosh.in
६.	अमरावती	सहसंचालक,लेखा व कोषागारे,अमरावती विभाग,अमरावती कोषागार कार्यालय इमारत, अमरावती ४४४ ६०२ दुरध्वनी क्र.०७२१-२६६२१३७, E-Mail ID-jd.amravati@mahakosh.in

विभागीय सहसंचालक यांनी करावयाची कार्यवाही :-

दि. १५/०९/२०१६ नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार कोणत्याही कारणास्तव करण्यात येणार नाही. तसेच परीक्षेला बसणा-या उमेदवारांचे अर्ज एकत्रितपणे एकाच वेळी कार्यालय प्रमुखाच्या शिफारशीसह कार्यालयामार्फत पाठवावेत. वैयक्तिकरित्या पाठविलेले अर्ज व आगाऊ प्रती स्वीकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच अपूर्ण माहिती भरलेले अर्ज फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

ज्या कर्मचा-यांच्या नेमणूका पूर्णत: तात्पुरत्या, विहित कार्यपध्दतीने पालन करुन झालेल्या नसतील ते परीक्षेस बसण्यास पात्र नाहीत. अशा कर्मचा-यांचे नावे अग्रेषितच करु नयेत.

या संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, उमेदवारांच्या परवानगी मिळण्याबाबतच्या अर्जामध्ये शेवटी देण्यात यावयाचे प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखांनी प्रमाणित केलेले नसते. याबाबत असे कळविण्यात येते की, प्रमाणपत्र प्रमाणित केल्याशिवाय अपुर्ण अर्ज या संचालनालयाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयाकडे पाठविल्यास त्यांचे बाबतीत कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही. इतर विभागातील वैकल्पीक तत्वावर बसू इच्छिणारा शासकीय कर्मचारी जर त्या त्या विभागास आवश्यक असलेली सेवा प्रवेशोत्तर (लिपीकवर्गीय) परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील तरच त्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षेच्या (भाग-२) करीता बसता येईल. तसेच इतर विभागातील अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची शिफारस करतांना सदर कर्मचारी लेखा संबंधी काम करीत आहेत किंवा लेखा विषयक काम करीत नाहीत असे अर्जासोबत असलेल्या कार्यालय / विभाग प्रमुखांनी द्यावयाच्या प्रमाणपत्राच्या अनुक्रमांक ३ मध्ये स्पष्टपणे नमूद करावे (योग्य तो पर्याय खोडावा किंवा विभाग प्रमुखांनी / कार्यालय प्रमुखांनी स्वत:च्या हस्ताक्षरात लिहावे) अन्यथा परवानगी नाकारली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

अर्जामध्ये सदर माहिती बिनचूक देणे ही जबाबदारी उमेदवाराची असून कार्यालय प्रमुखांनी ती पडताळून पहावी. या संदर्भात मागाहून कळविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही. ज्या अर्जामध्ये (१) ते (१६) हया अनुक्रमांकापुढे मागविलेली माहिती पूर्ण भरलेली नसेल असे अर्ज नाकारण्यात येतील व सदरहू अर्जाच्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. तसेच भरलेली माहिती स्वयंस्पष्ट असावी. काहीही माहिती नसेल तर तेथे निरंक असे लिहावे. (रेष ओढू नये).

आपल्या विभागातील या परीक्षेस बसण्यास परवानगी दिलेल्या उमेदवारांची यादी दिनांक **३०/०९/२०१६** पर्यंत किंवा तत्पूर्वी संचालनालयास पाठवावी. उमेदवारांनी परीक्षेस उपस्थित

राहतांना फोटो असलेले व कार्यालयप्रमुखाने साक्षांकित केलेले ओळखपत्र परीक्षा केंद्रावर आणणे बंधनकारक आहे. असे फोटो असलेले ओळखपत्र नसल्यास परीक्षेस बसू दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

परीक्षार्थींची यादी तयार करण्याबाबतच्या सूचना

सन २०१५ मध्ये घेण्यात येणा-या महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२) या परीक्षेसाठी सर्व विभागीय कार्यालयातून बसणा-या उमेदवारांना परीक्षेचे बैठक क्रमांक खालील तक्यात नमुद केल्याप्रमाणे देण्यात यावेत तसेच नवीन कर्मचा-यांची यादी तयार करताना प्रत्येक भागाची वेगळी यादी तयार करण्यात यावी.

अ.क्र.	विभागीय कार्यालयाचे नांव	बैठक क्रमांक
१.	सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती	AM १ पासून पुढे
२.	सहसंचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद	AU १ पासून पुढे
३.	सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण	KO १ पासून पुढे
४.	सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर	NA १ पासून पुढे
५.	सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक	NS १ पासून पुढे
६.	सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे	PU १ पासून पुढे

त्याचप्रमाणे यादी सादर करतांना परीक्षा **अनिवार्य** असलेल्या (संचालनालय लेखा व कोषागारे व अधिनस्त विभागीय सहसंचालक, अधिदान व लेखा कार्यालय, कोषागार कार्यालय, स्थानिक निधी लेखा कार्यालय, जिल्हा परिषद व त्यांचे अधिनस्त कार्यालय, वित्तीय सल्लगार व उपसचिव , अन्न व नागरी पुरवठा) या कार्यालयातील उमेदवारांची म्हणजे पाच विषय असलेल्या उमेदवारांची नांवे यादीमध्ये आधी समाविष्ट करावीत व त्यानंतर परीक्षा **ऐच्छिक** असलेले इतर शासकीय कार्यालयातील उमेदवारांची म्हणजे चार विषयाची परीक्षा देणार असलेले उमेदवार अशा क्रमाने यादी पाठविण्यात यावी. अनिवार्य उमेदवारांची स्वतंत्र यादी तयार झाल्यानंतर त्या यादीतील पुढील अनुक्रमांक देवून ऐच्छिक उमेदवारांची स्वतंत्र यादी सादर करावी. उमेदवार

त्याच बैठक क्रमांकानुसार परीक्षेस बसलेला आहे हे पाहण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाच्या सहसंचालक/उपसंचालकांची असेल. यासाठी सहसंचालकांनी वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करुन विहीत मुदतीत परिपूर्ण याद्या संचालनालयास सादर करणे आवश्यक आहेत याची नोंद घ्यावी.

विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व) यांनी सदर परीक्षेचा हजेरीपट अहवाल खालील प्रमाणे देण्यात यावा. ज्यामध्ये उमेदवार हजर असल्यास त्याची स्वाक्षरी असेल, गैरहजर असल्यास गैरहजर असल्याचे नमूद करावे आणि सूट मिळाली असल्यास सूट असे नमूद करावे. तसेच उमेदवार गैरहजर असल्याची तसेच **उमेदवारांना मागील परीक्षे सूट मिळाल्याबाबतची खात्री आपल्या स्तरावरुन काटेकोरपणे करण्याची दक्षता सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालयाने घ्यावी. यात काही त्रुटी आढळून आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

भाग-१

बैठक क्रमांक	उमेदवारांचे नांव	कार्यालयाचे नांव	पे.क्र.1	पे.क्र.2	पे.क्र.3

भाग-२

बैठक क्रमांक	उमेदवारांचे नांव	कार्यालयाचे नांव	पे.क्र.1	पे.क्र.2	पे.क्र.3	पे.क्र.4	पे.क्र.5

परीक्षार्थींना महत्वाची सूचना

महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षा नियम २०१२, शासन अधिसूचना दि.०३.०३.२०१२, नियम-१० अन्वये महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षेला बसलेल्या उमेदवाराला या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी दोन्ही भागांच्या म्हणजेच (भाग-१ व भाग-२) प्रत्येक विषयात एकूण गुणांच्या ४० टक्के गुण हे परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे मानक असेल. जर उमेदवार कोणत्याही एका विषयात जरी उत्तीर्ण झाला तर, त्याला त्या विषयात कायमची सूट देण्यात येईल.

परीक्षेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे.

महत्वाचे मुद्दे :-

1) परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांने त्यांच्या कार्यालय प्रमुखांकडे अर्ज सादर करावा व त्यांच्या कार्यालय प्रमुखानी संबंधित विभागीय सहसंचालक यांचेकडे दिनांक **१५/०९/२०१६** पर्यंत अर्ज सादर करावे.

2) सर्व विभागीय सहसंचालक यांनी परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करुन दिनांक **३०/०९/२०१६** पर्यंत या संचालनालयास पाठवावी.

3) परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेल्या उमेदवारांबाबतीत ते तीन संधीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांची पुढील वेतनवाढ रोखुन ठेवण्यात यावी.

4) उमेदवारांना मागील परीक्षेत सूट मिळाल्याबाबतची खात्री आपल्या स्तरावरुन काटेकोरपणे करण्याची दक्षता सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालयाने घ्यावी. यात काही त्रुटी आढळून आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

(स. अ. मु. नकवी)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

1. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई ४०० ०३५.
2. मंत्रालयातील सर्व विभाग / सर्व विभाग प्रमुख
3. सर्व विभागांचे आयुक्त
4. सर्व जिल्हाधिकारी
5. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
6. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन,नवी मुंबई
7. सहसंचालक, लेखा व कोषागारे पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / कोकण विभाग.
8. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/ औरंगाबाद/कोकण विभाग
9. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
10. वित्तीय सल्लागार आणि उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मुंबई

11. सर्व कोषागार अधिकारी
12. सहाय्यक संचालक (प्रशिक्षण) मुंबई / औरंगाबाद
13. लेखा अधिकारी, (प्रशिक्षण) मुंबई / पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती / औरंगाबाद
14. सर्व उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालये
15. इतर कार्यालये.

संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
परिपत्रक क्र. संलेको/परीक्षा/१७/_____ महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट क सेवा विभागीय परीक्षा/२०_____ /दिनांक_____

माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर _____ मध्ये होणा-या _____ महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट क सेवा विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२) या परीक्षेस बसण्यास परवानगी मिळण्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना.

खालील अनुक्रमांक (१) ते (१५) पर्यंतच्या सदरातील माहिती उमेदवाराने स्वहस्ताक्षरात शाईने भरावयाची आहे.

१. उमेदवाराचे नाव (आडनाव प्रथम) :

२. पदनाम :

३. कार्यालयाचे नांव :

४. कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, पिन कोड क्रमांक, दुरध्वनी व e-mail ID :

५. उमेदवाराचा e.mail ID व भ्रमणध्वनी क्र. :

६. ग्रेड वेतन :

७. जन्मतारीख :

८. स्थायी किंवा अस्थायी :

९. ज्या तारखेस परीक्षेस बसण्यासाठी अर्ज केला असेल त्या तारखेपर्यंत झालेली अखंड सेवा :

१०. अर्जदाराची सध्याच्या पदावरील नियुक्ती तारीख आणि पद, झालेली अखंड सेवा :

११. परीक्षा सक्तीची आहे की वैकल्पिक :

१२. अ) आपल्या खात्याने खात्यामध्ये कायम होण्यासाठी, :

भरती केल्यानंतर सेवाप्रवेशोत्तर किंवा तत्सम विभागीय परीक्षा ठरवून दिली आहे काय ?

ब) परीक्षा असल्यास, आणि त्या परीक्षेस उत्तीर्ण झाला आहात काय किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट प्राप्त असल्यास कार्यालयीन आदेशाचा क्रमांक व दिनांक :

क) परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष :

१३. आता परीक्षेच्या कोणत्या भागास बसण्यास परवानगी हवी आहे. (भाग-पहिला, भाग-दुसरा अथवा दोन्ही भाग) :

१४. उमेदवार जिल्हा परिषद कर्मचारी आहे काय ? :

१५. अ) मातृभाषा :

ब) मातृभाषा मराठी नसल्यास सक्तीची असणारी एतदर्थ मंडळाची मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण आहेत काय ? नसल्यास, उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली आहे काय ? :

१६. परीक्षा केंद्र

ठिकाण

दिनांक

उमेदवाराची सही

कार्यालय/विभाग प्रमुखांनी द्यावयाची प्रमाणपत्रे

१) अर्जदाराने आपल्या अर्जात (१) ते (१५) पर्यंतच्या सदरातील भरलेली माहिती या कार्यालयाच्या दप्तरावरून तपासून पाहिली. अर्जदाराने दिलेली माहिती बरोबर आहे.

२) (*) सेवा नियमानुसार अर्जदार महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा सेवा गट क विभागीय परीक्षा भाग-१ व भाग-२ ला बसण्यास पात्र आहे. अर्जदाराची पूर्वीची प्रगती व त्याप्रमाणे त्यांचे कार्यालयातील काम पाहून खास परवानगी /जादा संधी देण्याच्या विनंतीची शिफारस करण्यात येत आहे/करता येत नाही.

३) श्री./श्रीमती/कुमारी _____ हे/ह्या _____ वर्षापासून लेखासंबंधी काम करीत आहेत/काम करीत नाहीत.

(लेखा संबंधी काम करीत असल्याबाबत कार्यालय प्रमुखांनी योग्य तो पर्याय खोडावा दोन्ही पर्याय तसेच ठेवल्यास उमेदवार लेखा विषयक काम करीत नाही असे गृहित धरण्यात येईल.)

कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखांची सही व पदनाम
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद

(कृपया टिप पहावी)

---

*अर्जदाराला परीक्षा सक्तीची नसल्यास व तो परीक्षेस स्वेच्छेने बसत असल्यास हे खोडून टाकावे.

टिप :-*

१) जर एखाद्या विभागामध्ये कायम होण्याकरीता भरती केल्यानंतर त्या त्या कार्यालयाची सेवा प्रवेशोत्तर किंवा तत्सम विभागीय परीक्षा ठरवून दिलेली असल्यास ती परीक्षा पास झाल्यानंतरच या परीक्षेस (भाग-२) बसण्यास परवानगी दिली जाते.

२) उमेदवारांनी आपली नावे सुवाच्य अक्षरात लिहावीत.

प्रमाणपत्रामधील रकाना क्रमांक (३) हा संचालनालयास व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयाचे तसेच जिल्हा परिषदेमधील कर्मचारी सोडून इतर शासकीय विभागातील कर्मचा-यांचे संदर्भात त्यांचे विभागप्रमुखांनी/कार्यालयप्रमुखांनी हे प्रमाणपत्र द्यावयाचे आहे. त्यामध्ये संबंधित कर्मचारी लेखासंबंधी काम करीत आहे किंवा नाही हे प्रमाणित करावे.